महाराष्ट्र शासन

फोन नं. ०२२-६९१६२३००
romumbai@dtemaharashtra.gov.in
www.jdteromumbai.org.in

**सहसंचालक तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई**
जागतिक बँक प्रकल्पांतर्गत इमारत, पहिला मजला, शासकीय तंत्रनिकेतन परिसर
४९, खेरवाडी, अलियावार जंग मार्ग, वांद्रे(पूर्व) ,मुंबई ५१.

क्र. ४/विकामुं/तांशा/शिष्यवृत्ती/२०२४/ दिनांक :
**तात्काळ**

# परिपत्रक

विषय : व्यावसायिक अभ्यासक्रमास शै.व. २०२४-२५ पासून प्रवेश घेतलेल्या व याआधी प्रवेशित मुलींना शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्काच्या १००% लाभ शासनामार्फत देण्यात येणार असूनही, शैक्षणिक संस्थांकडून मुलींना प्रवेशाच्यावेळी सदर शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्काची रक्कम भरण्यास सक्ती करण्यात येत असलेल्या विद्यार्थीनींच्या तक्रारीबाबत. . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . . .

संदर्भ : १. उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शा.नि.क्र. शिष्यवृ-२०२४/प्र.क्र.१०५/तांशि-४, दि.०८/०७/२०२४
२. उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शा.परि.क्र. शिष्यवृ-२०२४/प्र.क्र.२०७/तांशि-४, दि.१९/०७/२०२४
३. तंत्रशिक्षण संचालनालयाचे पत्र क्र. १८/तंशिसं/विकाप/२०२४-२५/३११, दि. २३/०७/२०२४
४. या कार्यालयाचे परिपत्रक क्र. ४/विकामुं/तांशा/शिष्यवृत्ती/२०२४/२६५६, दि. २९/०७/२०२४
५. तंत्रशिक्षण संचालनालयाचे पत्र क्र. १८/तंशिसं/विकाप/२०२४-२५/३४६, दि. १२/०८/२०२४

सर्व पदविका संस्था, व्यावसायीक अभ्यासक्रमाच्या पदवी व पदव्युत्तर पदवी संस्थांनीं सोबत जोडलेले मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई यांच्या संदर्भीय क्र.५च्या परिपत्रकाचे अवलोकन करावे.

उपरोक्त विषयांकीत संदर्भीय १चा शासन निर्णयान्वये, राज्यातील शासकीय महाविद्यालये, शासन अनुदानीत अशासकीय महाविद्यालये, अंशतः अनुदानीत (टप्पा अनुदान) व कायम विनाअनुदानीत महाविद्यालये/तंत्रनिकेतने/सार्वजनिक विद्यापीठे, शासकीय अभिमत विद्यापीठे (खाजगी अभिमत विद्यापीठे/स्वयं अर्थसहाय्यित विद्यापीठे वगळून) व सार्वजनिक विद्यापीठांतर्गत येणाऱ्या उपकेंद्रामधील मान्यताप्राप्त व्यावसायिक अभ्यासक्रमास शासनाच्या सक्षम प्राधिकरणामार्फत राबविण्यात येणाऱ्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेद्वारे (Centralized Admission Process-CAP) (व्यवस्थापन कोट्यातील व संस्थास्तरावील प्रवेश वगळून) प्रवेशित विद्यार्थ्यांपैकी, ज्या मुलींच्या कुटुंबाचे वार्षिक उत्पन्न रु. ८.०० लाख किंवा त्यापेक्षा कमी आहे, अशा व्यावसायिक अभ्याक्रमांसाठी प्रवेश घेणाऱ्या आर्थिकदृष्ट्या मागास (EBC), आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक (EWS), सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्ग (SEBC), व इतर मागास वर्ग (OBC) प्रवर्गातील नवीन प्रवेशित तसेच पूर्वीपासून प्रवेशित असलेल्या (अर्जाचे नुतनीकरण केलेल्या) मुलींना उच्च व तंत्र शिक्षण विभागाकडून सध्या देण्यात येणाऱ्या शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्काच्या ५० टक्के लाभाऐवजी १०० टक्के लाभ देण्यास शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून शासन मान्यता देण्यात आलेली आहे.

तसेच संदर्भीय शासन निर्णय क्र.२च्या शासन परिपत्रकान्वये उपरोक्त प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांकडून प्रवेशाच्यावेळी शिक्षण शुल्काची संपूर्ण रक्कम भरावी असा आग्रह धरल्यास किंवा मागणी केल्यास अशा संस्थांविरुध्द कारवाई करण्यात येईल, अशा प्रकारच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत.

तंत्रशिक्षण संचालनालयाचे संदर्भीय क्र.३च्या पत्रातील निर्देशानुसार या कार्यालयाचे संदर्भीय क्र. ४च्या परिपत्रकान्वये सर्व संबंधीत संस्थांनी शै.व.२०२४-२५ पासून मुलींना शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्काच्या १००% लाभ शासनामार्फत देण्यात येणार असून, संदर्भ क्र. २च्या शासन परिपत्रकानुसार आर्थिकदृष्ट्या मागास (EBC), आर्थिकदृष्ट्या दुर्बल घटक (EWS), सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागासवर्ग (SEBC), व इतर मागास वर्ग (OBC) प्रवर्गातील विद्यार्थी/विद्यार्थीनींकडून प्रवेशाच्या वेळी शिक्षण शुल्काची रक्कम न घेण्याबाबत सूचना देण्यात आलेल्या आहेत. तरीही उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने, राज्यातील काही शैक्षणिक संस्थांमार्फत मुलींना शैक्षणिक शुल्काची रक्कम भरणेबाबत सक्ती करण्यात येत आहे.

Co for website display
02/08/2024

GOVERNMENT POLYTECHNIC RATNAGIRI
Inward No. 2702
Date 22-08-24
Section

याबाबत मुलींना शासनास किंवा संचालनालयास तक्रार करणेकरिता तंत्रशिक्षण संचालनालयाच्या www.dtemaharashtra.gov.in या संकेतस्थळावर खालील मदत दूरध्वनी क्रमांक व मदतकक्ष तिकीट लिंक उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

Helpline Numbers – 7969134440 / 7969134441
Helplinedesk Ticket Link – helpdesk.maharashtracet.org

तरी सर्व संबंधीत संस्थांना कळविण्यात येते की, वरील मदत दूरध्वनी क्रमांक व मदतकक्ष तिकीट लिंक सर्व विद्यार्थी/विद्यार्थीनींना माहिती होण्याकरिता संस्थेच्या दर्शनीभागी तसेच संस्थेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावी.

ज्या संस्था वरील सुचनांचे पालन करणार नाहीत अशा संस्थांना प्रत्यक्ष भेट देऊन अशा संस्थेवर कडक कारवाई करण्याचे निर्देश देण्यात आलेले आहेत. याची सर्व संबंधीत संस्थांनी नोंद घ्यावी.

Signed by
Pramod A Naik
Date: 20-08-2024 15:49:35

सहपत्रे : वरीलप्रमाणे

(प्रमोद अं. नाईक)
सहसंचालक
तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय, मुंबई

प्रति,
संचालक/कुलसचिव/प्राचार्य,
सर्व संबंधित शासकीय, अनुदानीत व विनाअनुदानीत पदविका, पदवी व पदव्युत्तर पदवी संस्था

प्रत माहितीसाठी : मा. संचालक, तंत्रशिक्षण संचालनालय, म.रा., मुंबई

# तंत्रशिक्षण संचालनालय,महाराष्ट्र राज्य.

३, महापालिका मार्ग, पत्र पेटी क्र.१९६७, मुंबई ४०० ००१.

दूरध्वनी क्र.०२२-६८५९७४८६ / ४८७

ई-मेल-- desk18@dtemaharashtra.gov.in, वेबसाईट: http://www.dtemaharashtra.gov.in


तात्काळ :: स्पीड पोस्ट / ई-मेलद्वारे

क्र:- १८/तंशिसं/विकाप/२०२४-२५/३४६

**परिपत्रक-**

दिनांक :- १२ /०८ /२०२४

प्रति,

सहसंचालक,

तंत्रशिक्षण विभागीय कार्यालय,

मुंबई/पुणे/नाशिक/छत्रपती संभाजीनगर/अमरावती/नागपूर.

विषय: व्यावसायिक अभ्यासक्रमांस शै.वर्ष २०२४-२५ पासून प्रवेश घेतलेल्या व याआधी प्रवेशित मुलींना शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्काच्या १०० टक्के लाभ शासनामार्फत देण्यात येणार असूनही, शैक्षणिक संस्थांकडून मुलींना प्रवेशावेळी सदर शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्काची रक्कम भरण्यास सक्ती करण्यात येत असलेल्या विद्यार्थीनीच्या तक्रारीबाबत ..

संदर्भ : १. उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्र.संकीर्ण-२०१७/प्र.क्र.३३२/तांशि-४, दि.०७/१०/२०१७.
२. उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन निर्णय क्र.शिष्यवृ-२०२४/प्र.क्र.१०५/तांशि-४, दि.०८/०७/२०२४.
३. उच्च व तंत्र शिक्षण विभाग, शासन परिपत्रक क्र.शिष्यवृ-२०२४/प्र.क्र.२०७/तांशि-४,दि.१९/०७/२०२
४. संचालनालयाचे पत्र क्र. १८/तंशिसं/विकाप/२०२४-२५/३११ दि.२३/०७/२०२४

उपरोक्त संदर्भांकीत शासन निर्णय क्र.२ अन्वये, राज्यातील शासकीय महाविद्यालये, शासन अनुदानित अशासकीय महाविद्यालये, अंशतः अनुदानित (टप्पा अनुदान) व कायम विनाअनुदानित महाविद्यालये / तंत्रनिकेतने / सार्वजनिक विद्यापीठे, शासकीय अभिमत विद्यापीठे (खाजगी अभिमत विद्यापीठे / स्वयं अर्थसहाय्यित विद्यापीठे वगळून) व सार्वजनिक विद्यापीठांतर्गत येणाऱ्या उपकेंद्रामधील मान्यताप्राप्त व्यावसायिक अभ्यासक्रमांस, शासनाच्या सक्षम प्राधिकरणामार्फत राबविण्यात येणाऱ्या केंद्रीभूत प्रवेश प्रक्रियेद्वारे (Centralized Admission Process-CAP) (व्यवस्थापन कोट्यातील व संस्थास्तरावरील प्रवेश वगळून) प्रवेशित विद्यार्थ्यांपैकी, ज्या मुलींच्या कुटूंबाचे वार्षिक उत्पन्न रु.८.०० लाख किंवा त्यापेक्षा कमी आहे, अशा व्यावसायिक अभ्यासक्रमांसाठी प्रवेश घेणाऱ्या आर्थिकदृष्टया मागास (EBC), आर्थिकदृष्टया दुर्बल घटक (EWS), सामाजिक व शैक्षणिकदृष्टया मागासवर्ग (SEBC) व इतर मागास वर्ग (OBC) प्रवर्गातील नवीन प्रवेशित तसेच पूर्वीपासून प्रवेशित असलेल्या (अर्जाचे नुतनीकरण केलेल्या) मुलींना उच्च व तंत्र शिक्षण विभाग, वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभाग, कृषि ,पशुसंवर्धन ,दुग्धव्यवसाय विकास आणि मत्स्यव्यवसाय विभाग व इतर मागास बहुजन कल्याण विभाग या विभागांकडून सध्या देण्यात येणाऱ्या शिक्षण शुल्क व परीक्षा शुल्काच्या ५० टक्के लाभा ऐवजी १०० टक्के लाभ देण्यास शैक्षणिक वर्ष २०२४-२५ पासून शासन मान्यता देण्यात आलेली आहे.

तसेच, संदर्भ क्र.३ च्या शासन परिपत्रकान्वये, उपरोक्त प्रवर्गाच्या विद्यार्थ्यांकडून प्रवेशाच्या वेळी शिक्षण शुल्काची संपूर्ण रक्कम भरावी असा आग्रह धरल्यास किंवा मागणी केल्यास अशा संस्थाविरुध्द कारवाई करण्यात येईल, अशा प्रकारच्या सूचना देण्यात आलेल्या आहेत.

संचालनालयाचे परिपत्रक क्र.४ नुसार, विभागीय कार्यालयांना, शै.वर्ष २०२४-२५ पासून, मुलींना शिक्षण शुल्क **व परीक्षा शुल्काच्या १०० टक्के लाभ** शासनामार्फत देण्यात येणार असून, संदर्भ क्र.३ **च्या** शासन परिपत्रकानुसार आर्थिकदृष्टया मागास (EBC), आर्थिकदृष्टया **दुर्बल घटक** (EWS), **सामाजिक** व शैक्षणिकदृष्टया **मागासवर्ग** (SEBC) व **इतर मागास वर्ग** (OBC) **प्रवर्गातील** विद्यार्थी/विद्यार्थीनींकडून प्रवेशाच्या वेळी शिक्षण शुल्काची रक्कम न घेण्याबाबत सूचना देण्यात आलेल्या आहेत. तरीही उपरोक्त विषयांच्या अनुषंगाने, राज्यातील काही शैक्षणिक संस्थामार्फत मुलींना शैक्षणिक शुल्काची रक्कम भरणेबाबत सक्ती करण्यात येत आहे.

याबाबत मुलींना शासनास किंवा संचालनालयांस तक्रार करणेकरिता संचालनालयाच्या संकेतस्थळावर खालील मदत दूरध्वनी क्रमांक व मदतकक्ष तिकीट लिंक उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे.

**Helpline Numbers -- 7969134440 / 7969134441**
**Helplinedesk Ticket Link -- helpdesk.maharashtracet.org**

याबाबत विभागीय सहसंचालकांनी त्यांचे अधिपत्याखालील सर्व शैक्षणिक संस्थेतील विद्यार्थ्यांपर्यंत याची माहिती त्वरीत पाठविण्याची व्यवस्था करावी.

तसेच, सर्व सहसंचालक, विभागीय कार्यालये यांना उपरोक्त विषयांच्या अनुषंगाने निर्देश देण्यात येत आहे की, विद्यार्थीनींकडून शैक्षणिक शुल्काची रक्कम भरण्यास सक्ती करणाऱ्या आपल्या अधिपत्याखालील संस्थांना व इतर सर्व संस्थांना प्रत्यक्ष भेट द्यावी व संबंधित संस्थेस समज द्यावी व अशा संस्थेवर कडक कारवाई करणे संदर्भात सुचना कराव्यात. जेणेकरुन या संदर्भात भविष्यात कोणत्याही विद्यार्थी / विद्यार्थीनीची तक्रार प्राप्त होणार नाही. तसेच, अशा संस्थांवर कारवाई करणे बाबतचा अहवाल संचालनालयास त्वरीत पाठवावा.

वरील सुचनांचे त्वरीत पालन करावे.

(डॉ. विनोद म. मोहितकर)
संचालक, तंत्रशिक्षण, म.रा.मुंबई

प्रत :- माहितीकरिता सादर.

१) मा. प्रधान सचिव, उच्च व तंत्रशिक्षण विभाग, ४ था मजला, मुंबई-३२.
२) मा. मंत्री, उच्च व तंत्रशिक्षण यांचे विशेष कार्य अधिकारी, मंत्रालय, मुंबई.
३) कार्यासन अधिकारी, कार्यासन क्र. २ व १० तंत्रशिक्षण संचालनालय, मुंबई.